Dr. Walkunje

**UGC Care Listed Journal**

## मराठवाडा इतिहास परिषद,
## औरंगाबाद-छत्रपती संभाजीनगर

(रजि.नं. एफ ८२० / दि. २६.०८.१९८२)

**ISSN : 0976 – 5425**

# History Research Journal
# इतिहास संशोधन पत्रिका

**Issue. - XXXIII December**
अंक - तेहतीस 2024

कार्यकारी संपादक
**डॉ. सोमनाथ रोडे**

**: संपादकीय मंडळ :**

डॉ. नारायण सूर्यवंशी डॉ. नितीन बावळे
डॉ. सुभाष बेंजलवार डॉ. भालचंद्र कुलकर्णी
प्रा. सर्जेराव बनसोडे

या अंकात व्यक्त केलेली विचार-मते ही मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद अथवा संपादक किंवा संपादक मंडळ यांची अधिकृत मते नाहीत. त्यांच्याशी ते सहमत असतीलच असे नाही.

| अ.क्र. | लेखक | पृष्टांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| ५. | Dr. Dhanaji Baburao Masal | १९४ | Contribution of Magas Samaj Seva Mandal in Educational Development of Backward Communities in Solapur |
| ६. | Shri. Keekan Priyesh Raghavan | २०१ | India and South Africa : A Glimpse at the Maritime Relationship between Crouching Tiger & Agile Springbuck |
| ७. | डॉ. जगदीश रामचंद्र लांजेकर | २११ | प्राचार्य वामन शिवराम आपटे यांचे शैक्षणिक योगदान |
| ८. | डॉ. गीताली टिळक व डॉ. दिपक ज. टिळक | २२४ | टिळक आणि आगरकर यांच्यातील तात्विक मतभेद |
| ९. | श्रीमती स्वाती आदिनाथ बांगर | २३३ | संत नामदेवांची राष्ट्रसंत प्रतिमा |
| १०. | कु. अर्चना गोविंदराव वाटोडे | २३९ | भारतीय समाज आणि वंध्य स्त्री : एक चिकित्सा |
| ११. | डॉ. नीलेश भाऊसो वळकुंजे | २४६ | गोवा मुक्ति संग्रामाचे अखेरचे पर्व : ऑपरेशन विजय |
| १२. | डॉ. विकास येलमार | २५९ | कोल्हापूर संस्थानातील पारंपरिक सहकार - एक चिकित्सक अभ्यास |


## संकीर्ण


१. मराठवाडा इतिहास परिषद अधिवेशने (दृष्टिक्षेपात) : २६६

२. मराठवाडा इतिहास परिषद अजीव सभासद यादी : २७२

३. मराठवाडा इतिहास परिषद संशोधन पत्रिका स्थायी सभासद यादी : २८०

४. मराठवाडा इतिहास परिषद उत्कृष्ट शोध निबंध पारितोषिके विजेते : २८५

(११)

# गोवा मुक्तिसंग्रामाचे अखेरचे पर्व : ऑपरेशन विजय

**डॉ. नीलेश भाऊसो वळकुंजे**
राजर्षि छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे अखेरचे पर्व म्हणजे गोवामुक्तिसंग्राम होय. या मुक्तिसंग्रामाने भारतातील युरोपीय वसाहतवादी व्यवस्थेचा शेवट केला होता. त्यामुळे गोवामुक्तिसंग्रामाचे आधुनिक भारताच्या इतिहासात अनन्य साधारण महत्त्व आहे. या मुक्तिलढ्याची सुरूवात दि. १८ जून १९४६ रोजी प्रजा समाजवादी नेते डॉ. राममनोहर लोहिया यांनी केली होती. त्यांनी मडगाव येथील मैदानात (आजचे लोहिया मैदान) पोर्तुगिजांच्या भाषणविषयक कायद्याचा भंग करून या मुक्तिलढ्याची सुरूवात केली. लोहिया यांची ही कृती गोव्याबरोबरच भारतीय जनतेला गोव्याच्या मुक्तीसाठी मार्ग दाखविणारी होती. गोव्याच्या मुक्तीसाठी गांधीप्रणीत सत्याग्रह हा मार्ग उत्तम पर्याय असल्याची जाणीव त्यांनी लोकांना करून दिली होती. परिणामी सन १९४६ ते १९५५ या कालावधीत गोव्याचा लढा पूर्णपणे सत्याग्रह चळवळीने व्यापला होता. या कालावधीमध्ये गोव्याच्या मुक्ततेसाठी अनेक सत्याग्रह चळवळी निर्माण झाल्या.

भारत सरकारने गोव्याच्या मुक्तीसाठी लष्करी कारवाईचे स्वरूप स्वीकारले. दि. १७ ते १९ डिसेंबर १९६१ या कालावधीत भारत सरकारने गोव्याच्या मुक्तीसाठी लष्करी कारवाई करून पोर्तुगिजांच्या ताब्यातून गोव्याची मुक्तता केली. या कारवाईला 'ऑपरेशन विजय' या नावाने संबोधले गेले.

**ऑपरेशन विजयची पार्श्वभूमी :**

गोवा विमोचन समितीच्या दि. १५ ऑगस्ट १९५५ च्या सामुदायिक सत्याग्रह चळवळीनंतर गोव्यात भूमिगत चळवळीने मोठ्या प्रमाणात जोर धरला होता. या चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे गोव्यातील पोर्तुगीज सरकार त्रस्त झाले होते. अशा

वातावरणात जागतिक पातळीवर पोर्तुगिजांची पडझड होण्यास सुरूवात झाली. भारत स्वतंत्र झाल्याच्या सुरूवातीपासूनच गोव्याच्या बाबतीत भारत व पोर्तुगीज यांच्यातील संबंध तणावाचे होते. मात्र नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाने आक्रमक स्वरूप स्वीकारणे हे धोक्याचे होतेच तसेच तत्कालीन आंतरराष्ट्रीय राजकारणाला ते अनुसरून नव्हते. यामुळे भारत सरकारने कोणत्याही प्रकारचे आक्रमक धोरण न स्वीकारता, शांतता व अहिंसा या मार्गाने हा प्रश्न सोडविण्याचे धोरण स्वीकारले होते. मात्र भारताच्या या धोरणात सन १९५९ साली परिवर्तन झाले. सन १९५९ साली आफ्रिकेत असणाऱ्या पोर्तुगिजांच्या सर्वांत मोठ्या अंगोला या वसाहतीत सशस्त्र उठाव झाला. या सशस्त्र उठावास पोर्तुगीज मित्रराष्ट्रांनी कोणत्याच प्रकारे विरोध केला नाही. यामुळे भारतीय नेतृत्वाला भविष्य काळात आपण गोव्याच्या मुक्तीसाठी लष्कराचा वापर केल्यास जागतिक पातळीवर काही अडचणी उभारणार नाही आणि अडचणी निर्माण झाल्यास त्यास आपण तोंड देऊ शकतो याची शाश्वती निर्माण झाली. याच दरम्यानच्या कालखंडात दि. १२ एप्रिल १९६० रोजी भारत व पोर्तुगाल यांच्यामध्ये हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात दादर-नगर हवेली प्रकरणी सुरू असलेल्या खटल्याचा निकाल भारताच्या बाजूने लागला. या निकालामुळे भारत सरकारच्या गोव्याबाबतच्या भूमिकेत आणखीन बदल होण्यास सुरूवात झाली. विशेषतः पंडित नेहरू यांच्या भूमिकेत महत्त्वपूर्ण असा बदल झालेला आपल्याला पाहायला मिळतो. सन १९४६ पासून गोव्याचा लढा अहिंसेच्या मार्गाने सोडविला पाहिजे, अशी प्रखर भूमिका मांडणाऱ्या नेहरूंच्या भूमिकेत सन १९६० नंतर आक्रमकपणा पाहायला मिळतो. हा आक्रमक प्रवाह सन १९६१ मध्ये अधिकच आक्रमक होत चाललेला आपल्याला त्यांनी वेळोवेळी सार्वजनिक असो की संसदेतून केलेल्या भाषणातून दिसून येतो. दि. १७ ऑगस्ट १९६१ रोजी राज्यसभेत भारताच्या परराष्ट्र धोरणाविषयी चर्चेला उत्तर देताना गोव्याच्या बाबतीत पंतप्रधान

नेहरू म्हणाले, 'आम्ही गोव्याच्या बाबतीत सशस्त्र बळाचा वापर करणार नाही, अशा अर्थाचे वचन या क्षणी कोणी माझ्याकडे मागतिले तर मी ते देऊ शकणार नाही. आम्ही काय करणार हे मला माहीत नाही; परंतु सर्वत्र ज्या घटना घडत आहेत त्यावरून मी सांगू इच्छितो की, गोव्याच्या संदर्भात शस्त्रबळाचा वापर करण्याची शक्यता डावलता येणार नाही.' याविषयी आणखी स्पष्टपणे वक्तव्य करताना ते म्हणाले की, 'आम्ही बलप्रयोग करणार नाही असे मुळीच नाही. तशी वेळ आली तर आम्ही गोव्यात आमचे सैन्य पाठवू, आम्ही ती गोष्ट गुप्त रीतीने न करता उघड रीतीने करू.'[१] नेहरू यांची ही भूमिका भविष्यकाळात होणाऱ्या लष्करी कारवाईची नांदी होती. नेहरूंच्या या भूमिकेनंतर भारताचे गृहमंत्री श्री. लालबहादुर शास्त्री यांनीही या भूमिकेला अनुकूल अशी भूमिका मांडली. ते म्हणाले की, 'पोर्तुगाल दिवसेंदिवस क्षीण बळ बनत असून भारताकडून थोडीबहुत मदत मिळाली तर गोवा लवकर मुक्त होईल.'[२]

नेहरूंच्या आक्रमक भूमिकेत दिवसागणिक वाढ होत होती. याचे प्रत्यंतर दि. २१ ऑक्टोबर १९६१ रोजी त्यांनी दिल्ली येथे केलेल्या भाषणातून प्राप्त होते. दि. २१ रोजी 'इंडियन कौन्सिल फॉर आफ्रिका' या संस्थेच्या वतीने दिल्ली येथील विज्ञान भवनात पोर्तुगीज वसाहतींच्या समस्यांच्या बाबतीत विचारविनिमय करण्यासाठी एक सेमिनार आयोजित केला होता. या सेमिनारच्या उद्‌घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणाले की, 'एक स्वतंत्र राष्ट्र या नात्याने भारत सरकारला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करावा लागतो परंतु याचा अर्थ असा नव्हे की गोव्याचा प्रश्न सोडवायला भारत सरकार शस्त्र बलाचा वापर करणार नाही.'[३] दिल्ली येथील सेमिनारमध्ये नेहरू यांनी ही भूमिका मांडून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर भविष्यकाळात भारताची गोव्याच्या बाबतीत कोणती भूमिका असेल याची जाणीव करून देत होते. नेहरूंच्या गोव्याबाबतच्या या

भूमिकेला सेमिनारमध्ये उपस्थित असणाऱ्या देशांच्या प्रतिनिधींनी पाठिंबा दर्शविला. नेहरूंच्या या भूमिकेवर मत मांडताना केनेथ कौंडांनी सांगितले की, 'भारताने ताबडतोब गोवा मुक्त केला तर आफ्रिकेतील पारतंत्र्य राष्ट्राचे स्वातंत्र्य जवळ येईल.'[४] हा आशावाद व्यक्त करून केनेथ पुढे म्हणाले की, 'या सर्व लढ्यांचे नेतृत्व नेहरूंनी करावे, आम्ही त्यांचे अनुयायी बनू."[५] आंतरराष्ट्रीय स्तराबरोबरच आपल्या देशातील लोकांनाही सरकार गोव्याच्या बाबतीत कोणते धोरण स्वीकारत आहे याची माहिती मिळाली पाहिजे. या भूमिकेतून त्यांनी दि. २३ ऑक्टोबर १९६१ रोजी मुंबई येथील चौपाटीवर झालेल्या सभेत गोव्याच्या बाबतीत भाष्य केले. ते म्हणाले, 'ही समस्या सोडविण्यासाठी वेगळा मार्ग अनुसरण्याचा नव्याने विचार करण्यास आम्हांस पोर्तुगीज भाग पाडत आहेत. कधी आणि कसा हे मी आता सांगू शकत नाही परंतु आम्ही तो नवीन मार्ग अनुसरू याविषयी मात्र संशय नाही."[६] यातील नवीन मार्ग कोणता याचे आकलन तत्कालीन जनतेला नक्कीच समजले असेल यात तिळमात्र शंका नाही.

पंडित नेहरू एकीकडे या आक्रमक भूमिका प्रभावीपणे मांडत असताना त्यांच्या भूमिकेचा प्रभाव पोर्तुगिजांच्यावर होत होता. मूलतः नेहरू यांना हेच हवे होते. आपण मांडत असलेल्या भूमिकेमुळे पोर्तुगिजांनी प्रत्यक्ष कोणत्याही स्वरूपाची कृती केली पाहिजे. कारण आपण जर पहिली अशी कृती केली तर ते आंतरराष्ट्रीय राजकारणाला अनुसरून नसणारे होते. पोर्तुगिजांनी जर पहिली अशी कृती केली तर जगाला आपण सांगू शकतो की पोर्तुगिजांनी आक्रमण केले म्हणून आम्हाला पर्याय नसल्याने आम्ही ही भूमिका घेतली आहे. नेहरूंच्या या भूमिकेला अपेक्षित असे यश नोव्हेंबर १९६१ पासून प्राप्त झाले. नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पंडित नेहरू अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. नेहरूंचा अमेरिकेचा हा दौरा पोर्तुगिजांच्या दृष्टीने भविष्यकाळात होऊ घातलेल्या प्रसंगासाठी फायदेशीर ठरणारा नव्हता.

याच विचारांतून नेहरू अमेरिका दौऱ्यावर असताना दि. १७ नोव्हेंबर १९६१ रोजी पोर्तुगिजांनी शिंदिया स्टीमशिपच्या साबरमती या मालवाहू बोटीवर अंजेदीव येथे गोळीबार केला तसेच दि. २४ नोव्हेंबर रोजी याच बोटीवर पुन्हा गोळीबार केला. या गोळीबारात रमाकांत आचरेकर या कोळ्याचा मृत्यू झाला.[७] पोर्तुगिजांच्या या कृतीमागे दोन कारणे होती. पहिले कारण होते या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारत पर्यायी कृती करेल. या पर्यायी कृतीचा परिणाम असा होईल की, नेहरूंचा अमेरिका दौरा यशस्वी होणार नाही. भारताने या पर्यायाचा स्वीकारही केला होता. या प्रकरणानंतर गोव्यावर आक्रमण करायचे, असा निश्चय नेहरू आणि मेनन यांनी केला होता व तशा प्रकारचे आदेशही दिले होते. मात्र नेहरूंनी दिलेले आदेश मागे घेतले.[८] दुसरे कारण होते याच कालखंडात दि. १५ ते १८ रोजी अमेरिका, ब्रिटन, टर्की, पाकिस्तान व इराण या राष्ट्रांची मुरगावपासून १५० मैल अंतरावर संयुक्त नाविकी कवायत सुरू होती. आपल्या कृतीला भारताने प्रत्युत्तर दिले तर पर्यायी स्वरूपात आपण अधिक प्रतिकार करायचा. ज्यामुळे युद्ध पेटेल व जवळच असलेले आपले मित्र आपल्या मदतीला येतील. मात्र भारताने अशी कोणतीही कृती न करता युनोमध्ये पोर्तुगिजांच्या या कृतीची तक्रार केली.

नोव्हेंबर महिन्यातील या घडामोडींना आणखीन जास्त गती डिसेंबर महिन्याच्या सुरूवातीपासूनच प्राप्त झाली. दि. ४ डिसेंबर रोजी भारताने लिस्बनमधील अरब रिपब्लिकच्या दूतावासाच्या मार्फत पोर्तुगालकडे कडक खलिता पाठविला. पोर्तुगीज सैनिक सरहद उल्लंघून भारतीय प्रदेशात शिरत असून रायफल व मशिनगनचा मारा करीत असल्याविषयी भारताने कडक शब्दांत पोर्तुगीज सरकारकडे तक्रार केली. मुळात या तक्रारीचा काडीमात्र फरक पोर्तुगिजांच्यावर होणारा नव्हता हे भारत सरकारला माहीत होते. मात्र युद्ध ही गोव्याची समस्या सोडविण्याचा मार्ग नाही तर शांततेत तो प्रश्न सोडविला पाहिजे, अशी आपली सुरूवातीपासूनची भूमिका

आहे व आजही ती कायम आहे हे दाखविण्याचा प्रयत्न भारत सरकार या माध्यमातून करीत होते. पोर्तुगिजांच्यावर लष्करी कारवाई केल्यानंतर जागतिक मत आपल्या बाजूने जास्तीत जास्त पद्धतीने कशा प्रकारे झुकेल यासाठी भारत सरकार प्रयत्न करीत होते तर दुसरीकडे मात्र पोर्तुगीज भारताच्या आखलेल्या धोरणात गुरफटत चालले होते. दि. ७ डिसेंबर रोजी त्यांनी ब्रिटनला विनंती केली की, सैन्य आणि दारूगोळा गोव्यात त्वरित पोहोचविण्यासाठी लिबियामधील एल. आडेम व मालदीव बेटातील गाम येथील रॉयल एअर फोर्स तळावर आपणास सवलत देण्यात यावी. मात्र ब्रिटनने तांत्रिक कारण पुढे करून त्यांची ही विनंती नाकारली. ब्रिटन व पोर्तुगीज यांचे मैत्रीचे संबंध १४ व्या शतकापासून अखंडपणे होते. असे असूनही ब्रिटनने या बाबतीत दिलेला नकार भारताच्या कूटनीतीचा विजयच म्हणावा लागेल.

एका बाजूला भारत सरकार कूटनीतीच्या धोरणाचा वापर करून जागतिक वातावरण आपल्या बाजूला ओढण्याचे प्रयत्न करीत होते तर दुसरीकडे गोव्यावरील लष्करी कारवाईची तयारी तितक्याच जोरदार पद्धतीने आखली जात होती. दि. २९ नोव्हेंबर रोजी भारत सरकारने दक्षिण कमांडचे कमांडर-इन-चीफ लेफ्टनंट जनरल जे. एन. चौधरी यांना गोव्यातील लष्करी कारवाईची स्पष्ट माहिती देऊन त्या संबंधित विस्तृत तयारी करण्याचे आदेश दिले तसेच त्यांची गोवा-दीव-दमणच्या सरहद्दीवर होणाऱ्या लष्करी हालचालीचे सूत्रधार म्हणून नेमणूक करण्यात आली.[९] त्यानुसार चौधरी यांनी दि. ११ डिसेंबरपर्यंत गोव्यासाठी बेळगाव, दमणसाठी वापी व दीवसाठी उना येथे सैन्याची जमवाजमव पूर्ण केली. गोव्यावर कारवाई करण्यासाठी १७ वी इन्फट्री डिव्हिजन, ५० वी इंडेपेन्डे प्यारा ब्रिगेड, २ शिख लाईट इन्फट्री आणि २ लाईट आर्मर्ड रेजिमेंट, एक मीडियम तोफखान्याची रेजिमेंट व काही इंजिनीअर युनिट्स इतके सैन्य जमविले होते.[१०] जनरल चौधरी यांच्या नेतृत्वाखालीही सर्व तयारी सुरू असतानाच गोव्यावरील

प्रत्यक्ष स्वारीचे नेतृत्व मेजर जनरल के. पी. केंडेथ यांच्याकडे सोपविण्यात आले होते.[११] वरीलप्रमाणे सर्व लष्करी तयारी सुरू असतानाच लष्कराच्या कार्यात कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण न होण्याची काळजी गोव्यातील स्थानिक लोकांनी घेतली होती. या कामी माजाळी व त्याच्या आसपासच्या १६ गावांत ग्रामसंरक्षक केंद्राची स्थापना करण्यात आली होती. अफवांना आळा घालणे, निर्वासितांना आश्रय देणे, जखमींची शुश्रूषा करणे इत्यादी कामेही केंद्रे करणार होते. वैद्यकीय कार्याला चालना मिळावी यासाठी या सर्व केंद्रांनी मिळून एक तात्पुरते हॉस्पिटल उभे केले होते. हे सर्व कार्य श्री राम काकोटकर यांच्या नेतृत्वात सुरू होते.[१२]

एकीकडे भारत आपली तयारी करीत होते तर दुसरीकडे पोर्तुगाल आपल्या परीने या अंतिम संघर्षाची तयारी करीत होते. मात्र हा संघर्ष होऊ नये व पोर्तुगिजांचे गोव्यातील साम्राज्य नष्ट होऊ नये यासाठी काही देश प्रयत्न करीत होते. यामध्ये अमेरिकेची महत्त्वाची भूमिका होती. गोव्यात पोर्तुगिजांचे राज्य असणे हे अमेरिकेच्या भविष्यकालीन राजकारणासाठी विशेषतः शीतयुद्धकालीन राजकारणासाठी योग्य ठरणारे होते. म्हणून हे युद्ध होऊ नये व गोवा स्वतंत्र होऊ नये अशा प्रकारची भूमिका अमेरिकेने अखेरच्या क्षणी घेतली होती. मूलतः भारताला गोव्यावर स्वारी दि. १५ डिसेंबर रोजी करायची होती. मात्र अमेरिकेने भारताला सध्या असे न करता आणखीन सहा महिन्यांसाठी ही कारवाई पुढे ढकलावी, अशी भूमिका मांडली. यासाठी अमेरिकेचे भारतातील दूतावास जी. के. गॉलब्रेथ हे पंडित नेहरू यांच्यावर दबाव निर्माण करीत होते.[१४] अमेरिकेच्या अखेरच्या क्षणी आलेल्या या भूमिकेमुळे दि. १५ डिसेंबर रोजीची कारवाई भारत सरकारने दि. १८ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलली याचा अर्थ असा नाही की अमेरिकेच्या दबावामुळे भारताने हे पाऊल उचलले तर दि. १७ डिसेंबर रोजी रशियाचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष एल. आय. ब्रेझवेन हे भारताच्या दौऱ्यावर येणार होते. गोव्याच्या बाबतीत सुरूवातीपासून रशियाची

भूमिका भारताच्या बाजूने होतीच. मात्र गोव्यावर लष्करी कारवाई केल्यानंतरही प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीपुढे गेल्यास त्या ठिकाणी रशिया कोणती भूमिका घेणार याचा अंदाज घेण्यासाठी होती. दि. १७ डिसेंबर रोजी ब्रेझवेन यांनी मुंबईला भेट दिली. या भेटी वेळी त्यांनी जाहीर सभेत घोषणा केली की, 'गोवा-दमण-दीवच्या विमोचनासाठी भारत करीत असलेल्या कृतीला आपल्या राष्ट्राचा संपूर्ण पाठिंबा असेल.'[३५] ब्रेझवेन यांच्या या घोषणेनंतर काही तासांत भारताने आपले सैन्य गोव्यात प्रत्यक्ष कृती करण्यासाठी पाठविले. दुसरे असे की, खरेच भारत अमेरिकेच्या दबावापुढे झुकून तारीख पुढे ढकलत आहे असे असते तर दि. १८ डिसेंबर रोजीही अमेरिकेने युद्ध थांबवावे किंवा पुढे ढकलावे यासाठी नेहरूंवर दबाव आणला होता. याची माहिती खुद्द नेहरू यांनी दि. २८ डिसेंबर १९६१ रोजी दिल्ली येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली होती.[३६] म्हणून भारताने अशी कोणतीच कृती केली काय? तर याचे उत्तर नाहीच आहे.

**ऑपरेशन विजय :**

या सर्व घडामोडीच्या नंतर भारताने अखेर दि. १७ डिसेंबरच्या रात्री १२ वाजल्यानंतर गोव्यावर स्वारी केली. गोव्यावर स्वारी करण्यासाठी एकच ठिकाणाहून गोव्यात प्रवेश न करता उत्तर, पूर्व व दक्षिण अशा तीन दिशांनी प्रवेश केला. यातील उत्तर व पूर्व या दोन बाजूने मुख्यतः गोव्यावर आक्रमण करायचे होते. दक्षिणेकडील आक्रमण हे पोर्तुगिजांचे उत्तर व पूर्वेकडील लक्ष विचलित व्हावे यासाठी होते.[१७] भूदलाने गोव्यावर आक्रमण केल्यानंतर भारतीय हवाई दलाने हवेतून पत्रके संपूर्ण गोव्यात टाकली. ही पत्रके टाकण्यामागील उद्देश हा भारतीय सैन्याने गोव्यावर स्वारी केली आहे याची माहिती मिळावी यासाठी. या पत्रकात लिहिले होते की, 'भारतीय सैन्य तुमचे मित्र असून तुम्हाला आपल्या देशबांधवांशी एक होण्याची हवी असणारी संधी ते उपलब्ध करून देईल पण अद्यापही

गोव्यातील लोकांनी पोर्तुगिजांच्या राक्षसी विध्वंसक प्रकारापासून आपले व आपल्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी सावध राहिले पाहिजे. आता आपल्या स्वातंत्र्याचे स्वागत करून रक्षण करण्यास सिद्ध राहा."[१८]

हवाई दलाचे हे कार्य सुरू असताना भूदलाने आपले कार्य शीघ्र गतीने सुरू केले होते. उत्तरेकडून २ प्यारा मराठा, १ प्यारा पंजाब व २ शिख लाईट पायदळ दलाने गोव्यात नियोजित ठिकाणांवरून प्रवेश केला आणि पणजीकडे आगेकूच केली. पूर्वेकडून ६३ वी पायदळ ब्रिगेडने दोन मार्गांनी गोव्यात प्रवेश केला. दक्षिणेकडून रजपूत ४ बटालियनची 'बी' कंपनी व एस. आर. पी. चे काही पोलिस यांनी माजाळीवरून काणकोणमार्गे गोव्यात प्रवेश केला. या मार्गे प्रवेश करून मडगाव जिंकण्याचे कार्य दक्षिणेकडील सैन्याचे होते. उत्तरेकडून गोव्यात दि. १८ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजता १ प्यारा पंजाब दलाने गोव्यात प्रवेश केला व प्रथम हे दल माटणे येथे पोहोचले. तेथून ते मावळिंगे-डीचोली-पिळगावमार्गे भाणस्तरी येथे पोहोचले तर २ प्यारा मराठा दलाने डिचोलीकडे कूच केली होती.

२ शिख बटालियन दोडामार्ग-आस्नोडा-थिये-म्हापसा-बेतीमार्गे पणजीवर हल्ला करणार होती. यासाठी या बटालियनची विभागणी दोन तुकड्यांत करण्यात आली होती. यातील तुकडी क्रमांक एक आस्नोडा-थिये-कोलवाळ-म्हापसामार्गे बेती येथे पोहोचले. बेतीपासून पणजीचे अंतर फक्त ५४९ मी. इतके होते. तर दुसरी तुकडी कासारपाल-आस्नोडा-थियेमार्गे म्हापसा येथे पोहोचली. म्हापसा शहराचे रक्षण करण्यासाठी या तुकडीतील काही सैन्य या ठिकाणी ठेवून उर्वरित तुकडीने बेती येथे कूच केली. २ प्यारा मराठा दलास साखळी-उसगाववरून फोंड्यास दि. १८ डिसेंबर रोजी पोहोचायचे होते. यानुसार या दलाने डिचोली-उसगाव-मावई नंदीमार्गे फोंड्यास कूच केली. दि. १८ डिसेंबर रोजी उत्तरेकडून भारतीय सैन्याची वरीलप्रमाणे आगेकूच होत असताना पूर्वेकडूनही अशा प्रकारेच ६३ व्या पायदळ

दलाने आपली कामगिरी पार पाडली. हे दल अनमोड येथून दोन तुकडींत विभाजित होऊन दोन मार्गांनी त्यांनी पणजीकडे कूच केली. एक गट अनमोड येथून फोंड्याकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्याने आपले मार्गक्रमण करीत होता तर दुसरी तुकडी रस्त्याच्या बाजूने जंगलातून मार्गक्रमण करीत होती. मोले येथे दोन्ही तुकड्या एकत्र आल्या. मोले येथून पुन्हा या दोन्ही तुकड्या दोन वेगवेगळ्या मार्गांनी फोंड्याकडे निघून गेल्या व सायंकाळी या दोन्ही तुकड्यांनी फोंडे गाठले.[१९]

एकीकडे सैन्याची कारवाई सुरू असताना भारतीय नभोवाणी सैन्याला मदत करण्यासाठी आपल्या परीने कार्य करीत होती. भारतीय नभोवाणीच्या मुंबई केंद्राने खास मराठी व कोकणी कार्यक्रम सुरू करून भारतीय सैन्याला सहकार्य करण्याचे आवाहन गोव्यातील जनतेला केले. 'गोव्यातील देवळे, चर्चेस, इमारती व पूल तुमच्या निढळाच्या घामाने बांधलेले आहेत. आज पोर्तुगीज त्यांचा नाश करू पाहात आहेत. तो थांबविण्यास भारतीय सैनिकांना मदत करा. पोर्तुगिजांनी तुम्हाला शतकानुशतके लुटले आहे. आज अखेरच्या क्षणी ते तुमच्या जिवावरच उठतील. त्यांना चांगली जरब बसवा.' या आवाहनाबरोबरच मुंबई केंद्राने गोव्यातील जनतेला काही सूचनाही केल्या. त्या पुढीलप्रमाणे होत्या...

(१) तुमच्यापैकी जे पोर्तुगिजांच्या सैन्यात असतील त्यांनी आपली शस्त्रे भारतीय सैनिकांच्या स्वाधीन करावीत व घरी परतावे. सर्वांना उदारपणे वागविले जाईल.

(२) जे कोणी अराष्ट्रीय वर्तन करण्याचा संभव आहे त्यांचे पत्ते व ठावठिकाणा जवळच्या भारतीय पोलिस ठाण्यावर अथवा लष्करी केंद्रावर सांगावा.

(३) सर्व सार्वजनिक सेवाकार्य सुरू ठेवा. पोतुगिजांना त्यात हस्तक्षेप करू देऊ नका.[२०]

दि. १८ डिसेंबरच्या रात्री १० च्या सुमारास मेजर जनरल कँडेथ व १७ व्या डिव्हिजनचे जी. ओ. सी. मोले येथे १० वा. पोहोचले. दुसऱ्या दिवशी सर्वांनी पुढे कूच करावे, असा हुकूम त्यांनी सगळ्या तुकड्यांना दिला. ४८ व्या ब्रिगेडने पुढे जाऊन पणजीचा ताबा घ्यावा. ६३ व्या ब्रिगेडने मडगाव व मुरगाव, ५० व्या ब्रिगेडने फोंड्याचा ताबा घ्यावा, अशीही योजना त्यांनी या वेळी सैनिकांना दिली. मात्र त्यांनी हुकूम दिल्याच्या काही वेळातच १७ व्या डिव्हिजनच्या मुख्य कचेरीचा दक्षिण कमांडच्या कचेरीशी संपर्क खंडित झाला. यामुळे दक्षिण कमांडने ५० व्या ब्रिगेडला आदेश दिला की, दि. १९ डिसेंबर रोजी शक्य तेवढ्या लवकर पणजी ताब्यात घ्यावी. ज्या वेळी ५० व्या ब्रिगेडला हे हुकूम देण्यात आले होते तेव्हा ५० व्या प्यारा ब्रिगेडच्या दोन तुकड्या बेती व भाणस्तारी येथे होत्या. त्यामुळे या दोन्ही तुकड्यांमध्ये पणजी ताब्यात घेण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली. ही स्पर्धा २ शिख लाईट पायदळाने जिंकली. पोर्तुगिजांची पोलिस मुख्य कचेरी, जकात कचेरी, गव्हर्नर जनरलचा वाडा, सचिवालय, मिलिटरी कँप ताब्यात घेणे ही लक्षणे त्यांना देण्यात आली होती. ती त्यांनी चोख पार पाडली. हे करीत असताना पोर्तुगिजांनी अल्पसा गोळीबार केला. मात्र याचा फारसा अडथळा या कार्यात झाला नाही.

भाणस्तारवरून निघालेल्या १ प्यारा पंजाब युनिट नागरी वाहनांच्या मदतीने दि. १९ डिसेंबरच्या सकाळी ०८:३० च्या सुमारास पणजी येथील सचिवालयाजवळ पोहोचले व त्यांनी सचिवालयाचा ताबा घेतला. या वेळी तेथे असलेल्या पोर्तुगीज सैनिकांनी १ प्यारा पंजाब दलाच्या कमांडिग अधिकाऱ्याकडे शरणागती पत्करली. मात्र गव्हर्नर जनरल शरण आलेला नव्हता. तो मडगाव येथे पळून गेला होता. सचिवालयाच्या बरोबर काबो राजनिवास, सरकारी गोडाऊन, नागरी व मिलिटरी हॉस्पिटल, ट्रेझरी, हायकोर्ट, विद्युत गृह इत्यादींवर कब्जा करण्याचेही कार्य या तुकडीने केले होते. उत्तरेकडून आलेल्या तुकड्या दिलेल्या आदेशाप्रमाणे आपली कार्ये पार पाडीत असतानाच पूर्वेकडून आलेल्या ६३ व्या तुकडीला दिलेल्या आदेशा-प्रमाणे त्यांनी मडगाव-मुरगावकडे कूच केली. या तुकडीच्या सोबत ४ शिख लाईट पायदळ व २ बिहार कंपनी होत्या. यातील २ बिहार तुकडीने वेर्णे गावात असलेल्या

पोर्तुगीज सैनिकांच्या तुकडीवर हल्ला करून त्यांना शरण येण्यास भाग पाडले. वेर्णे येथे शरण आलेल्या पोर्तुगीज सैनिकांमध्ये २७ अधिकारी व ४२१ इतर हुद्यांचे सैनिक होते तर ४ शिख लाईट पायदळ तुकडीने मडगाव ताब्यात घेतले होते. अखेर दि. १९ डिसेंबरच्या सायंकाळीपर्यंत भारतीय सैनिकांनी संपूर्ण गोवा आपल्या ताब्यात घेतला. सायंकाळी ६ च्या दरम्यान ६३ व्या ब्रिगेडचे कमांडर ब्रिगेडियर के. एस. धिल्लन वास्कोतील आल्पकैरूश कँपमध्ये आले. त्यांनी पोर्तुगीज सैनिकांची औपचारिक राहिलेली शरणागती स्वीकारली. या शरण आलेल्या १८० अधिकारी व २६०० सैनिकांना भारतीय सैन्याने अटक केली.[२१] या शरणागती दस्तावर पोर्तुगिजांचे गव्हर्नर जनरल व्हासालू ई सिल्व्हा यांनी सैन्याचे कमांडर इन चीफ या नात्याने सही केली.[२२]

४५१ वर्षांच्या प्रदीर्घ अशा गुलामगिरीतून गोव्याच्या बरोबर भारताची सुटका झाली आणि भारताच्या स्वातंत्र्याची सुरू असलेली लढाई पूर्ण झाली. भारत ख़्या अर्थाने दि. १९ डिसेंबर १९६१ रोजी परकीय वसाहतवादी व्यवस्थेतून स्वतंत्र झाला. या कारवाईत भारताचे ०८ सैनिक शहीद झाले [२३] तर पोर्तुगिजांचे १३ सैनिक ठार झाले व १० जखमी झाले.[२४] मात्र भारतातून जाताना पोर्तुगिजांनी त्यांच्या मूळ प्रवृत्तीचा प्रत्यय जगाला दाखवून दिला. भारताच्या या सैन्य कारवाईच्या दरम्यान पोर्तुगीज सैन्याने व अधिकाऱ्यांनी मिळून गोव्यातील ६६ लाख ७१ रूपयांच्या सार्वजनिक मालमत्तांचे नुकसान केले.[२५] या विध्वंस करण्यामागे त्यांना भारताच्या सैन कारवाईस अडथळा निर्माण करावयाचा होता. भारताच्या या कारवाईनंतर पोर्तुगिजांनी युनोमध्ये धाव घेतली होती. मात्र रशियाने त्यांचा नकाराधिकाराचा अधिकार वापरून सुरक्षा समितीपुढे आलेल्या पोर्तुगिजांची मागणी फेटाळून लावली.[२६]

वरील सर्व बाबींचा विचार करता 'ऑपरेशन विजय' ही लष्करी मोहीम भारताच्या परराष्ट्रीय व अंतर्गत धोरणाचा मूलभूत विजय होता. या घटनेनंतर भारतातील यूरोपीय वसाहतवादाचा शेवट झाला. भारतात यूरोपीय वसाहतवादाची सर्वप्रथम स्थापना पोर्तुगिजांनी इ. स. १४९८ साली केली होती. याच यूरोपीय

वसाहतवादाचा शेवट ही पोर्तुगीज साम्राज्याच्या शेवटाने म्हणजेच दि. १९ डिसेंबर १९६१ रोजी झाला. त्यामुळे 'ऑपरेशन विजय' हा फक्त भारताच्या धोरणात्मक पैलूचा विजय होता, इतक्याच घटकापुरता मर्यादित नव्हता तर या ऑपरेशन विजयमुळे भारतातील यूरोपीय वसाहतवादाच्या शेवटाबरोबर भारतीय स्वातंत्र्य लढ्याचाही शेवट झाला नि खऱ्या अर्थाने भारत संपूर्णपणे स्वतंत्र झाला.

**संदर्भ :**


(१) दैनिक केसरी, दि. १८ ऑगस्ट १९६१, पृ. ०१.

(२) दैनिक केसरी, दि. १३ ऑक्टोबर १९६१, पृ. ०३.

(३) पाक्षिक दूधसागर, दि. ०१ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(४) दैनिक तरूण भारत, दि. १५ ऑगस्ट १९६१, पृ. ०४.

(५) दैनिक मातृभूमी, दि. २७ ऑक्टोबर १९६१, पृ. ०२.

(६) दैनिक केसरी, दि. २४ ऑक्टोबर १९६१, पृ. ०१.

(७) दैनिक सकाळ, दि. २८ नोव्हेंबर १९६१, पृ. ०१.

(८) वामन राधाकृष्ण, गोवा मुक्तिसंग्राम, स्मृति व्याख्यानमाला प्रकाशन, पुणे, १९८९, पृ. ११४.

(९) दैनिक सकाळ, दि. ०७ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१०) दैनिक केसरी, दि. २४ डिसेंबर १९६१, पृ. ०५.

(११) दैनिक केसरी, दि. ०८ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१२) दैनिक सकाळ, दि. ११ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१३) दैनिक केसरी, दि. १८ ऑगस्ट १९६१, पृ. ०१.

(१४) दैनिक केसरी, दि. १८ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१५) Free Press Journal, Bombay, 29th December 1961, P. 01.

(१६) दैनिक सकाळ, दि. १८ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१७) दैनिक केसरी, दि. १९ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१८) दैनिक सकाळ, दि. १९ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(१९) दैनिक केसरी, दि. १९ डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(२०) दैनिक केसरी, दि. २६ डिसेंबर १९६१, पृ. ०३.

(२१) पुराणिक नारायण,स्वातंत्र्याने पावन झालेला गोमंतक,किर्लोस्कर मासिक,फेब्रु. १९६२, पृ.१३.

(२२) दैनिक मातृभूमी, दि. २० डिसेंबर १९६१, पृ. ०१.

(२३) दैनिक तरूण भारत नागपूर, दि. ०१ जानेवारी १९६२, पृ. ०२.

(२४) दैनिक केसरी, दि. २२ मे १९६२, पृ. ०३.

(२५) दैनिक सकाळ, दि. २० डिसेंबर १९६१, पृ. ०१.


OOO